संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

जनसंपर्क विभाग

---

## सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती श्री विकास शिरपूरकर यांची विद्यापीठाला भेट

### कुलगुरूंनी केला सत्कार

अमरावती -

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती श्री विकास शिरपूरकर यांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला आज भेट दिली. याप्रसंगी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी शाल, श्रीफळ, पुस्तक व स्मृतिचिन्ह देवून त्यांचा विद्यापीठाच्यावतीने सन्मानपूर्वक उभयता सत्कार केला. याप्रसंगी सौ. कुमकुम शिरपूरकर, प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, आय.आय.एम.सी.चे संचालक डॉ. विजय सातोकार, सौ. सुषमा सातोकार व जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

विद्यापीठाचा निसर्गरम्य परिसर, परिसरातील जैवविविधता यांसह विद्यापीठातील विकास कामांची पाहणी न्यायमूर्ती श्री शिरपूरकर यांनी केली. विद्यापीठाचा सुंदर परिसर पाहून मोहित झाल्याच्या आणि कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांच्या कार्यकाळात विद्यापीठाचा विकास झपाट्याने होत असल्याच्या भावना देखील त्यांनी व्यक्त केल्यात. विद्यापीठाला भेट दिल्याबद्दल कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर व प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर यांनी त्यांचे आभार मानले.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ०५/०८/२०१९.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी